संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# मोदींना प्रमोशन, चायवाला ते चौकीदार

प्रसिध्द व्यंगचित्रकार आर. के.. लक्ष्मण यांनी एका मुलाखतीत आपल्या व्यंगचित्रांबद्दलचा आनंद व्यक्त करताना सांगितले होते की भारतामध्ये व्यंगचित्रांसाठी विषयांची अजिबात कमतरता नाही. आणि सर्वाधिक विषय हे आम्हाला भारतातले राजकारणी देत असतात. अर्थातच ही गोष्ट शंभर टक्के खरी आहे आणि याच राजकीय व्यंगचित्रांवर शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी एक पूर्ण साप्ताहिकच काढले.असाच व्यंगचित्रांसाठीचा ताजा आणि तितकाच खमंग विषय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यंगचित्रांसाठी पुरवला आहे. त्यानी स्वतःला चौकीदार असे म्हणून घेतल्याने पुढचे काही महिने चौकीदाराच्या वेशातली त्यांची व्यंगचित्रे सगळ्याच वृत्तपत्रातून ठळकपणे प्रसिध्द होत राहातील. प्रत्येक राज्यातले वृत्तपत्र आपापल्या राज्यातील चौकीदाराचा म्हणजे पोलिसाचा जसा वेष आहे तशा पध्दतीने नरेंद्र मोदींचे व्यंगचित्रच पाहायला मिळत राहील. राहुल गांधी यांनी राफेल विमान घोटाळ्याच्या निमित्ताने मोदींचा चौकीदार म्हणून जसा उल्लेख केला आणि तो धागा पकडून नरेंद्र मोदीनी वारंवार आपण चौकीदार आहोत अशा प्रत्युत्तराचा भडीमार केला. आता तर त्यांनी या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारामध्ये चौकीदारालाच कँपेन मास्टर बनवले आहे. यापूर्वी म्हणजे २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात त्यांनी आपण एक साधारण चहा विकणारे विक्रेते होतो.असे सांगून मतदारांमध्ये सहानुभूती मिळवण्याचा जोरदार प्रयत्न केला त्यात त्यांना यशही आले आणि हाच चायवाला जेव्हा पंतप्रधान झाला त्यावेळी त्यांनी त्याचे श्रेय स्वतः चा पक्ष आणि देशातल्या लोकशाही व्यवस्थेला दिले होते. भारतातल्या लोकशाहीमुळे एका सामान्य चहावाल्याला मोठ्या पदावरचाही लाभ होऊ शकतो असे विधान त्यांनी त्यावेळी केले होते. आता बहुतेक या चायवाल्याला चौकीदाराचे प्रमोशन मिळालेले दिसते. आणि म्हणून त्यांनी आक्रमकपणे चौकीदार हा शब्दच पकडून प्रत्युत्तरादाखल प्रचाराची नवी मोहीम उघडली असावी. निदान लोकसभा निवडणूक काळात या चौकीदार वेषातले मोदींचे व्यंगचित्र लोकांची तितकीच करमणूक करणारे ठरू शकते. आणि म्हणूनच राजकारणातून व्यंगचित्रासाठी किंवा मनोरंजनासाठीसुध्दा भरपूर विषय उपलब्ध होत आहेत असे म्हणावे लागते.

### देशाला कप्तान हवा

गेल्यावेळी लोकसभा निवडणूक जिंकल्यानंतर मोदी यांनी स्वतःला प्रधान सेवक म्हणवून घेतले होते. पंतप्रधान या शब्दाऐवजी त्यांना प्रधानसेवक हा शब्द जास्त जवळचा वाटला. किंवा त्यातला सेवक हा शब्द सामान्य माणसाची किंवा मतदाराची सहानुभूती मिळवून देईल असाही त्यांचा कयास असावा. खरे तर त्यांनी स्वतःला चायवाला म्हटले काय प्रधान सेवक म्हटले काय किंवा चौकीदार म्हटले काय लोकांच्या दृष्टीने फारसा फरक पडत नाही. ते नरेंद्र मोदीच राहातात. मात्र सामान्य मतदाराच्या सहानुभूतीकरीता शब्दांचे हे खेळ केले जातात. कोणताही देश असो. त्याला खंबीर नेतृत्वाची आवश्यकता असते. किंवा निर्णय क्षमता असलेल्या कणखर अशा कप्तानाची आवश्यकता असते. जो कोणी देशाचे नेतृत्व करू इच्छितो त्याने स्वतःला काहीही म्हणवून घेतले तरीसुध्दा त्याच्यामध्ये कप्तानाचे गुण आहेत का हेच सर्वप्रथम मतदार पाहातो. चौकीदार म्हटल्यामुळे मतदारांच्या मनावर फार मोठा परिणाम होईल असे समजण्याचे कारण नाही. कप्तानाला आपली स्वतःची टीम सांभाळता आली पाहिजे आणि संपूर्ण मैदानावरचे क्षेत्ररक्षणही योग्य पध्दतीने करता आले पाहिजे.मोदी यांनी स्वतःच्या ट्विटर हँडलचे नाव बदलून चौकीदार नरेंद्र मोदी असे केले. स्वाभाविकपणे आपल्या नेत्याची मर्जी संपादन करण्याकरीता पक्षाध्यक्षांपासून पक्षातल्या अनेक नेत्यानी आपापल्या नावापुढे चौकीदार हा शब्द लावून घेतला. आतापर्यंत सत्तेच्या रुबाबात स्वतःला मालक म्हणून मिरवणारे हे नेते अचानक चौकीदार व्हायलाही तयार झाले. अर्थात मोदींची गोष्ट वेगळी आहे आणि या बाकी चौकीदार म्हणवून घेणाऱ्या पलटणीची गोष्ट वेगळी आहे. या बाकीच्या नेत्यांना फक्त स्वतःच्या चौकीचे संरक्षण करण्यातच जास्त स्वारस्य असते. तेव्हा मोदींपाठोपाठ स्वतःला जरी चौकीदार म्हणवून घेतले तरी त्यांचे खरे रूप त्यांच्या मतदार संघातील लोकांना माहीत आहे. आणि अशा पध्दतीने चौकीदारांची मेगाभरती होऊ लागली. तर खऱ्या खुऱ्या चौकीदारांनी काय करायचे असाही प्रश्न निर्माण होईल. तेव्हा ही चौकीदारी निवडणुकीपुरतीच आहे यात काही शंका नाही.

### प्रामाणिकपणाची कसोटी

युध्दात आणि प्रेमात सगळे काही क्षम्य असते असे अनेकवेळेला म्हटले जाते. आता निवडणूक प्रचारातही बरेच काही क्षम्य असते असे म्हणण्याची वेळ आली आहे. राजकारण्यांना प्रचारासाठी काय काय कल्पना सुचतील याचा काही भरोसा देता येत नाही. मग मोदींची चौकीदारी असेल किंवा प्रियांका वडेरांची गंगायात्रा असेल. ही तर यावेळच्या लोकसभा निवडणुकीची सुरुवातीची झलक आहे. अजून सगळ्या पक्षांचे जाहीरनामे प्रसिध्द व्हायचे आहेत. त्यामधून काय काय वल्गना केल्या जातात. हेदेखील तितकेच आश्चर्यकारक आणि मनोरंजन करणारे ठरत असते. मत मागताना हे राजकारणी स्वतःची पतही कशी सांभाळू शकत नाहीत हे यानिमित्ताने सिध्द झालेले आहे. वाटेल तशी आमिषे दाखवली जातात. वाटेल तसे शब्दप्रयोग करून सामान्य मतदारांचा बुध्दीभेदही केला जात असतो. नकळतपणे मतदारांमध्ये संभ्रमही निर्माण होतो. आणि या सगळ्या अस्थिर परिस्थितीचा राजकारणी बरोबर फायदा घेत असतात. चौकीदारीचा हा प्रयोगही याच प्रकारात मोडतो. एक बरे झाले की वेगवेगळ्या शब्दातून वेगवेगळे पर्याय मतदारांपुढे येत आहेत. आता त्यातल्या कोणाला महत्व द्यायचे हे जनताच चाणाक्षपणे ठरवेल. ज्यावेळी वारंवार चौकीदार असा उल्लेख होतो आणि मोदींपाठोपाठ भाजपाचे नेतेही स्वतःला चौकीदार म्हणवून घेत असतील तर त्यांच्या प्रामाणिकपणाची जबरदस्त कसोटी लागणार आहे. हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे.